नि.दि.दा.क्र.२३४/२०२४
**वैशाली वि. धनंजय**
**MHPU130013122024**

## <u>नि.क्र. २६ वरील आदेश</u>

( दि. ०८/०७/२०२५ रोजी पारीत)

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ यांनी लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून लेखी कैफियत अभिलेखावर घेण्यासाठी सादर केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. २ चे असे कथन आहे की, कागदपत्रे मुदतीत मिळाली नसल्यामुळे कैफियत दाखल करता आली नाही असे कथन करून अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी यांनी निशाणी क्र. २९ येथे त्यांचे म्हणणे देवुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी मुद्दामहून विलंब केला आहे. असे कथन करून अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र. २ तर्फे व वादी तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद केला. प्रतिवादीचे असे कथन आहे की, कागदपत्रे मुदतीत मिळाली नसल्यामुळे कैफियत दाखल करता आली नाही त्यामुळे लेखी कैफियत देण्यास विलंब झाला आहे. प्रतिवादीने त्यांचे कथनांच्या पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र दिले आहे. प्रतिवादी कैफियत दाखल करू इच्छित आहेत. सदर दाव्यात प्रतिवादी लेखी कैफियत दाखल करीत आहे. त्यामुळे सदर दाव्याचा गुणानुगुणावर निपटारा होण्यासाठी सदर लेखी कैफियत अभिलेखावर घेतल्याने मदतच होणार आहे. लेखी कैफियत अभिलेखावर न घेतल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. लेखीकैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे योग्य व न्याय होईल. प्रतिवादीने कैफियत देण्यास केलेल्या विलंबामुळे होणा-या त्रासाची भरपाई वादीस काही रक्कम देवून करता येईल. सबब, वरील कारणांचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २ यांना लेखी कैफियत देण्यास झालेला विलंब वादीस रक्कम रूपये २००/- इतकी भरपाई देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो व कैफियत अभिलेखावर घेण्यात येते.

Sd/-

दि. ०८/०७/२०२५

**( र.आ.सावंत)**
सह दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
सासवड